# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५ महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ : ई-मेल :




## पात्रता विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/ 8660 दिनांक : - 9 NOV 2022

प्रति

**मा. प्राचार्य / संचालक**
संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय : पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रलंबित असलेल्या पात्रता कार्यवाही संदर्भात..**

संदर्भ :
१) विद्यापीठ प्रणालीव्दारे महाविद्यालयास कळविण्यात आलेल्या पात्रता त्रुटी
२) या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२१-२२/६७९८ दि. १४/०९/२०२१

**महोदय / महोदया,**

संदर्भ क्र. २ अन्वये आपल्या महाविद्यालयातील व विद्यापीठ शैक्षणिक संकुलातील ज्या विद्यार्थ्यांचा पात्रता त्रुटी पूर्तता अहवाल अद्यापपर्यंत विद्यापीठास सादर केलेला नाही व त्यामुळे अंतिम पात्रता प्रलंबित आहे, अशा विद्यार्थ्यांचा त्रुटी पूर्तता अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत स्मरण देण्यात आले होते.

मात्र असे निदर्शनास येत आहे की, काही विद्यार्थ्यांच्या अंतिम पात्रता अद्यापही प्रलंबित आहेत. याबाबत पुन:श्च कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालय / शैक्षणिक संकुलातील ज्या विद्यार्थ्यांची त्रुटी पूर्ततेअभावी अंतिम पात्रता अद्याप झालेली नाही, अशा विद्यार्थ्यांचा त्रुटी पूर्तता अहवाल संबंधित कागदपत्रांसह विद्यापीठास त्वरीत सादर करुन, विद्यार्थ्यांची अंतिम पात्रता करुन घ्यावी व प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, जेणेकरुन विद्यार्थ्यांना गुणपत्रिका मिळणे सोईस्कर होईल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या अंतर्गत ज्या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी प्रवेशित होतात अशा महाविद्यालयांनी संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा करुन विद्यार्थी प्रवेश मान्यता यादी प्राप्त करुन ती त्वरीत विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांच्या अंतिम पात्रतेसाठी सादर करावी.

तसेच सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांची पात्रता महाविद्यालयाला दिलेल्या Online Link मधून तपासून विद्यार्थ्यांना त्याबाबत अवगत करणे आवश्यक आहे. तथापि असे दिसून आले आहे की, काही महाविद्यालये विद्यार्थ्यांना त्यांची पात्रता झालेली आहे किंवा नाही याची माहिती महाविद्यालय स्तरावरुन न देता, त्यासाठी थेट विद्यापीठामध्ये पाठवत आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. तरी आपण आपल्या महाविद्यालयास दिलेल्या लिंकमधून तपासणी करुन विद्यार्थ्यांना त्यांच्या पात्रतेबाबत आपल्या स्तरावरुनच अवगत करावे. त्याबाबत काही अडचणी असल्यास महाविद्यालयाने विद्यापीठशी संपर्क साधावा ही विनंती.

आपली स्नेहांकित,

(योगिनी घारे)
**कुलसचिव**